आदर्शगांव योजनेंतर्गत हिवरेबाजार ता. जि. अहमदनगर येथे अद्ययावत प्रशिक्षण केंद्राच्या पाणीपुरवठयासाठी होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आगास २०१६/प्र.क्र.१५६/जल-८**

मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: ०३ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :- आगास-२०१०/प्र.क्र.२६/जल-८, दिनांक ०६ मार्च, २०१२
२) शासन निर्णय, मृद व जलसंधारण विभाग क्रमांक :- आगास-२०१६/प्र.क्र.१५६/जल-८, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७
३) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन तथा सदस्य सचिव, आदर्शगांव योजना संकल्प व प्रकल्प समिती, पुणे यांचे पत्र क्रमांक- आगास/हिबाप्रकें/पा.पु/७५०/२०१८, दिनांक २९/११/२०१८ व क्रमांक- आगास/हिबाप्रकें/पा.पु/३४०/२०१८, दिनांक २४/०५/२०१९

**शासन निर्णय :-**

आदर्शगांव योजनेंतर्गत हिवरेबाजार ता. जि. अहमदनगर येथे अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी संदर्भाधीन दिनाक ६ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयानुसार प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामाच्या रु.६००.४५ लाख व रु.५९९.७० लाख या दोन टप्प्यापैकी रु.६००.४५ लाख रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर रक्कम वसुंघरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या संस्थेच्या खात्यात ठेवण्यात आलेली होती. सदर रकमेवर दिनांक ३१.३.२०१६ अखेर जमा झालेल्या रु.४५,६६,६२३/-इतक्या व्याजाच्या रकमेतून सदर प्रशिक्षण केंद्राच्या पाणीपुरवठा या स्वतंत्र योजनेसाठी रु ३६,५५,२३४/-(रुपये छत्तीस लाख पंचावन्न हजार दोनशे चौतीस फक्त) इतक्या रक्कमेस संदर्भाधीन क्र. २ येथील ३१/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर प्रशिक्षण केंद्राच्या सदर पाणी पुरवठा योजनेच्या कामामध्ये बदल होत असल्याने सदर कामाचे रु.६१,५०,३१४/-इतक्या रकमेच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता द्यावी, तसेच वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या संस्थेच्या खात्यात दि.२७/११/२०१८ अखेर जमा असलेल्या रु.२२,९९,३४८/- इतक्या व्याजाच्या रकमेतून सदर पाणीपुरवठा योजनेचा खर्च करण्यास अनुमती द्यावी. असा प्रस्ताव संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन तथा सदस्य सचिव, आदर्शगांव योजना संकल्प व प्रकल्प समिती, पुणे यांनी संदर्भाधीन क्र. ३ येथील दिनांक २४/०५/२०१९ च्या पत्रान्वये सादर

केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा योजनेसाठी एकूण रु.५९,५४,५८२/- (अक्षरी रुपये एकोणसाठ लक्ष चोपन्न हजार पाचशे ब्याऐंशी फक्त) इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर पाणीपुरवठा योजनेचा खर्च वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्राणा, पुणे या संस्थेच्या खात्यात दि.२७/११/२०१८ अखेर जमा असलेल्या रु.२२,९९,३४८/- इतक्या व्याजाच्या रकमेतून करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

(अ) **प्रशिक्षण केंद्र इमारतीच्या बांधकामासंदर्भात पाणीपुरवठयासाठी होणाऱ्या खर्चात कोणत्याही परिस्थितीत वाढ होणार नाही.**

**(ब) वित्तीय औचित्याच्या तत्वाप्रमाणे सदर व्याजाची रक्कम ही प्रस्तुत योजनेच्या कामांसाठीच खर्च होईल, जेणेकरुन आदर्शगांव संकल्पनेचे उद्दिष्ट सफल होईल.**

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्रमांक २३७/२०१७/व्यय-१५, दिनांक १५/०७/२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०३११४१५४८६२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravi Shivaji Vhatkar

Digitally signed by Ravi Shivaji Vhatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Soil and Water Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bca9a9d38f4447074d53ffd7129d6c978023dfe76311c98a4ffd7de9447d9bb9, serialNumber=85ad116139ecb1182dd7fbef85e39485778bb2d61f5a53c998ffd46129875c23, cn=Ravi Shivaji Vhatkar
Date: 2019.08.03 15:56:50 +05'30'

**( र. शि. व्हटकर )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई,
४. सर्व सन्माननिय संसद सदस्य व विधानसभा / विधानपरिषद सदस्य,
५. मा. मंत्री (मृद व जलसंधारण), यांचे खाजगी सचिव,
६. मा. राज्यमंत्री (मृद व जलसंधारण), यांचे खाजगी सचिव,
७. मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे,

९. मुख्य सचिव यांचे सचिव,
१०. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिध्दीकरीता),
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१६. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
१७. कृषि उपसंचालक, आदर्श गांव संकल्प व प्रकल्प समिती,कृषि भवन, पुणे-५,
१८. महालेखापाल, महाराष्ट्र १/२(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई / नागपूर,
१९. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
२०. अधिदान व लेखाधिकारी /निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२१. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
२२. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
२३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
२४. कक्ष अधिकारी/ जल-११, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२५. कार्यासन/जल-८ (निवड नस्ती).